# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २१/०४/२०२२ (गुरूवार)

---

**देवलापार येथील घरफोडीचा पर्दाफाश**
**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई...**

दिनांक १६/१०/२०२१ रोजी दुपारी १२/००वा. ते १४/००वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे निलेश रामेश्वर बमनोटे, वय २८ वर्ष, रा. बेलदा यांचे राहते घराचे मागील दाराची कडी तोडुन आत प्रवेश करून आलमारीचे लॉकर मधील सोन्याचे दागीने, नगदी व एक VIVO कंपनिचा मोबाईल चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे देवलापार येथे अप.क्र. १६४/२१ कलम ४५४,३८० भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. गुन्हा दाखल झाले पासुन स्थानिक गुन्हे शाखा हे सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत होते.

समांतर तपासा दरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक ग्राम केरीया ता.चौरई, जि.छिंदवाडा मध्यप्रदेश येथे जावुन सदर गुन्हयातील संशयीत विधीसंघर्षग्रस्त बालक यास यातील नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपूस केली असता तो प्रथमत: उडवाउडवीचे उत्तरे देवु लागला. त्यादरम्यान त्यास विश्वासात घेवुन अधिक विचारपूस केली असता त्याने वरील नमुद गुन्हा केल्याचे सांगीतले. त्यावरुन त्यास नमुद गुन्हयातील चोरीस गेलेल्या मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता त्याने सांगीतले की, त्याने केलेल्या सदर चोरीमधील विवो कंपनीचा मोबाईल सध्या तो वापरत असुन तो स्वत:कडे असल्याचे सांगीतले. त्यावरुन सदर विधीसंघर्ष बालकांच्या ताब्यातुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेला एक विवो कंपनीचा नेव्ही ब्ल्यु रंगाचा Y12S मॉडेलचा अॅन्ड्राईड मोबाईल ज्याची अंदाजे किंमत १०,०००/—रुपये व नंतर त्याचे सांगणे प्रमाणे सोन्याची चैन अंदाजे वजनी १० ग्रॅम, किंमत अंदाजे ५०,०००/—रुपये असा एकुण ६०,०००/—रू चा माल जप्त करून पो.स्टे. देवलापार येथील दिवसा घरफोडीचा गुन्हा उघडकिस आणुन जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील कायदेशीर प्रक्रीयेकरीता पो.स्टे.देवलापार येथे यांचे ताब्यात देण्यात आलेला असुन पुढील तपास पो.स्टे. देवलापार करीत आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा.,यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, पोहवा गजेंद्र चौधरी, पोना अमोल वाघ, विपीन गायधने, रोहन डाखोरे व सायबर सेलचे सतिष राठोड यांनी पार पाडली.

**(सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.)**

## विनयभंग करणा—या विरूध्द गुन्हा नोदं

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** — अंतर्गत मौजा ग्राम पंचायत जवळ सालइधाबा ता हिंगणा जि नागपुर. दिनांक १९.०४.२२ चे १८/१५ वा दरम्यान, यातील फिर्यादी ही सार्वजनीक नळावर पाणी भरण्याकरीता जात असता, यातील आरोपी नामे — प्रज्वल श्रीराम कंगाले रा सालइधाबा ता हिंगणा जि नागपुर हा फिर्यादीस आडवा होवुन "तु राहत असलेले घर खाली करून दे" असे म्हणाला, फिर्यादीने नकार दिल्याने फिर्यादीचा गळा धरून खाली पाडुन विनयभंग करून हातातील चाकु मारून किरकोळ जख्मी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोस्टे एमआयडिसी बोरी येथे आरोपीविरूध्द कलम ३५४, ३२४,२४१,५०६ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास सफौ दयाराम करपाते मो न ९९६०८६२४७८ हे करीत आहेत.

## अपघातात जखमी

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** अंतर्गत पिपळा डाग बंगला ईसापुर फाटा १० किमी पश्चिम, दिनांक १९/४/२२ चे १९/३० ते १९/४५ वा दरम्यान, यातील जख्मी हे आपले मोटर सायकल कं. एम एच ४० बी ८५०२ बजाज सिटी १०० ने जात असतांना, यातील अल्टो कार कं. एम एच ४९ एई ५४८८ चे चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जख्मीचे मोटर सायकलला जोरदार धडक मारून जख्मी केले. व मोक्यावरून पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे —नंदलाल देवनाथ तिवारी वय ५४ रा. वार्ड कं ०२ ओमनगर चनकापुर यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे आरोपी विरूध्द कलम २७९,३३७ भादवी १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला आहे, सदर गुन्हयाचा पुढील तपास ए एस आय नामदेव धांडे पो स्टे खापरखेडा मो नं ९९२२४२१२४६ करीत आहेत.

## अकस्मात मृत्यु

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** अंतर्गत मौजा १४ मैल सुतगिरनीच्या मागे कळमेश्वर. यातील मृतक नामे— सौ संत्राबाई चकलु राजे वय ४५ वर्ष रा जुडालोहार जि. बागौरघाजर छत्तीसगड हल्ली मुक्काम १४ मैल नागपुर ही दिनांक १८/०४/२०२२ चे १९/०० वा. सुमारास आपल्या घरी अनिल धानोरे चे विटभट्टी १४ मैल सुतगिरनीच्या मागे पो.स्टे. कळमेश्वर हददीत आपले पती व मुलांना जेवन देत असता अचानकपने तिला झोपडीतच चक्कर आल्याने तिच्या शरीराचा उजवा भाग ढीला पडल्याने तिला उपचारा कामी प्रायव्हेट हॉस्पीटल शालीनीताई मेघे वानाडोंगरी येथे नेले असता रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता सी एम ओ यांनी तिला तपासुन दिं. १८/०४/२०२२ चे १९/४५ वा ब्रॉड डेथ घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री मेश्राम मो क्र ९०७५२४५०५९ करीत आहेत.

## <u>विहीरीचे पाण्यात उडी घेुवन आत्महत्या.</u>

**<u>पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी :—</u>** अंतर्गत, यातील मृतक नामे — **राष्ट्रपाल अंबादास तेलंग वय ३८ वर्ष, रा अंतरगाव ता.समुद्रपुर जि.वर्धा ह.मु. कटरे हाउसींग सोसायटी टाकळघाट**, हा केइसी कंपनी येथे ठेकेदाराकडे काम करीत होता, मागील एक महीन्यापासुन काम नसल्याने दि. १९/४/२२ रोजी सकाळी ६.०० वा घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन जावुन खापरी शिवारात विहीरीचे पाण्यात उडी घेुवन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— संघपाल अंबादास तेंलंग वय ३८ वर्ष रा टाकळघाट यांचे रिपोर्टवरून पो स्टे एमआयडिसी बोरी येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला, सदर मर्गचा पुढील तपास सफौ प्रमोन बंसोड मो. न ९६७३६०८६४२ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**